MHPU180020642018

**<u>निशाणी क्र.४७ वरील आदेश</u>**
(दिनांक २२.०३.२०२४)

प्रस्तुत अर्ज वादींतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

२. त्यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांच्याविरुध्द गांव मौजे बोरीऐंदी, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्र.८२८, ७५६, ७६१, ८० व ३९८ या दावा मिळकती संदर्भात वाटप, ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदरील दावा प्रलंबित असतांना काही महत्वाच्या घटना (Subsequent Events) घडल्या आहेत. वादी यांनी सदरील दावा प्रलंबित असतांना गांव मौजे बोरीऐंदी, ता. दौंड, जि. पुणे गट क्र.७६४, ७५८ व १४५ या मिळकती संदर्भात महाराष्ट्र जमीन महसुल च्या कलम १५५ नुसार मे. तहसीलदार दौंड येथे दुरुस्ती करीता अर्ज केलेला होता. सदरील दुरुस्ती अर्ज मे. तहसीलदार साहेब यांनी फेटाळला आहे. वादी यांनी नजरचुकीने व अनावधानाने दाव्यात नमुद केले होते की, सदरील गट क्र.७६४, ७५८ व १४५ या मिळकतीचे गेनबा व गणपत यांचेमध्ये वाटप झालेले आहे व गट क्र.७६४, ७५८ व १४५ या मिळकती दाव्याचा विषय नाही. परंतु हक्कनोंदणी/वाटप/एसआर/२४७/१९९३ नुसार फेरफार क्र.१३८२ नुसार गट क्र.७६४, ७५८ व १४५ या मिळकतीच्या संपुर्ण क्षेत्राचे गेनबा व गणपत यांच्यामध्ये वाटप झाले नसुन केवळ तान्हुबाई तुकाराम भोसेकर यांच्या ४ आणे क्षेत्राचे वाटप झाले आहे. म्हणुन सदरील दाव्यात गांव मौजे बोरीऐंदी, ता. दौंड, जि. पुणे गट क्र.७६४, ७५८ व १४५ या मिळकती दावा मिळकती म्हणुन समाविष्ठ करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व गरजेचे आहे.

३. त्यांचे पुढे असे कथन आहे की, वादी हे अशिक्षित असुन त्यांना कायद्याचे व व्यवहाराचे ज्ञान नाही. वादी यांना दावा दाखल करताना दावा मिळकतीचे चतुःसिमा माहित नव्हत्या व वादी यांनी अतितातडीमुळे चतुःसिमा नमुद न करता दावा दाखल केला होता व त्यानंतर नजरचुकीने व अनावधानाने दावा मिळकतीच्या चतुःसिमा समाविष्ठ करण्याचा अर्ज दाखल करण्याचा राहुन गेलेला आहे. त्यानंतर दावा प्रलंबित असताना व दरम्यानच्या काळात वादी यांना महसुल अभिलेखामधुन दावा मिळकतीच्या चतुःसिमा मिळाल्या आहेत. त्यामुळे दावा मिळकतीच्या चतुःसिमा समाविष्ठ करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व गरजेचे आहे. त्यामुळे नवीन दावा मिळकती व दाव्याच्या चतुःसिमा दाव्यामध्ये नमुद करणे वादग्रस्त प्रश्न निश्चित करण्याच्या व न्यायाच्या दृष्टीने गरजेचे व योग्य वाटत आहे. म्हणुन वादी सदरील दुरुस्तीचा अर्ज दाखल करत आहेत. वादी सदरील दाव्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती मागु इच्छीततात:–

**अ)** दावा गट क्र.८२८ कलम १(अ) मध्ये खालील चतुःसिमा समाविष्ठ करण्यात यावा

| | | |
|---|---|---|
| **पुर्वेस** | – | गट क्र.८२८, ८२५. |
| **पश्चिमेस** | – | गट क्र.८३६, ८२९. |
| **दक्षिणेस** | – | गट क्र.८२७, ८३६, ८४२. |
| **उत्तरेस** | – | गट क्र.८२०, ८२४. |

**आ)** दावा गट क्र.७५६ कलम १(ब) मध्ये खालील चतुःसिमा समाविष्ठ करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| **पुर्वेस** | – | गट क्र.७५७. |
| **पश्चिमेस** | – | गट क्र.७५७. |
| **दक्षिणेस** | – | गट क्र.७५७. |
| **उत्तरेस** | – | ओढा. |

**इ)** दावा ७६१ कलम १(क) मध्ये खालील चतुःसिमा समाविष्ठ करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| **पुर्वेस** | – | गट क्र.७५९. |
| **पश्चिमेस** | – | गट क्र.७६२. |
| **दक्षिणेस** | – | गट क्र.७६२ चे उर्वरित क्षेत्र. |
| **उत्तरेस** | – | गट क्र.७६२. |

**ई)** दावा गट क्र.८० कलम १(ड) मध्ये खालील चतुःसिमा समाविष्ठ करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| **पुर्वेस** | – | गट क्र.७९. |
| **पश्चिमेस** | – | गट क्र.५२. |
| **दक्षिणेस** | – | गट क्र.८१. |
| **उत्तरेस** | – | गट क्र.५२. |

**उ)** दावा गट क्र.३९८ कलम १(इ) मध्ये खालील चतुःसिमा समाविष्ठ करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| **पुर्वेस** | – | कासुर्डी शिव. |
| **पश्चिमेस** | – | गट क्र.३७९, ओढा. |
| **दक्षिणेस** | – | गट क्र.३९९. |
| **उत्तरेस** | – | गट क्र.३७२. |

**ऊ)** दावा मिळकत इ नंतर खालील दावा मिळकती इ(१), इ(२), इ(३)

म्हणुन समाविष्ठ करण्यात याव्यातः–

**इ(१)** तुकडी पुणे पोट तुकडी ता. दौंड यांचे हद्दीतील तसेच मे. सह दुय्यम निबंधक केडगांव यांचे हद्दीतील गांव मौजे बोरीयेंदी येथील शेतजमीन गट क्र.१४५ यांसी एकुण क्षेत्र ०९ हे. ३९ आर अधिक पोटखराबा ०३ हे २५ आर यांसी आकार ०४ रु. १२ पैसे, यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणेः–

**पुर्वेस** – गट क्र.१४९, १४४, १४३, १४२, १४१.
**पश्चिमेस** – गट क्र.२३ ते २९.
**दक्षिणेस** – गट क्र.१४६, १४७, १४८.
**उत्तरेस** – गट क्र.४०.

**इ(२)** तुकडी पुणे पोट तुकडी ता. दौंड यांचे हद्दीतील तसेच मे. सह दुय्यम निबंधक केडगांव यांचे हद्दीतील गांव मौजे बोरीयेंदी येथील शेतजमीन गट क्र.७५८ यांसी एकुण क्षेत्र ०० हे. ५५ आर अधिक पोटखराबा ०० हे ०० आर यांसी आकार ०२ रु. १९ पैसे, यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणेः–

**पुर्वेस** – गट क्र.७५६, ७५७.
**पश्चिमेस** – गट क्र.७५९.
**दक्षिणेस** – गट क्र.७६०.
**उत्तरेस** – ओढा.

**इ(३)** तुकडी पुणे पोट तुकडी ता. दौंड यांचे हद्दीतील तसेच मे. सह दुय्यम निबंधक केडगांव यांचे हद्दीतील गांव मौजे बोरीयेंदी येथील शेतजमीन गट क्र.७६४ यांसी एकुण क्षेत्र ०७ हे. ९० आर अधिक पोटखराबा ०० हे १४ आर यांसी आकार १६ रु. ९७ पैसे, यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणेः–

**पुर्वेस** – गट क्र.७६५, ७६३.
**पश्चिमेस** – गट क्र.७७९, ७८९, ७९०.
**दक्षिणेस** – गट क्र.७७७.
**उत्तरेस** – गट क्र.८२०.

**ऋ)** दाव्यातील कलम ६ मधील खालील मजकुर वगळण्यात यावा अथवा टाकुन देण्यात यावा.

"आणि हक्कनोंदणी/वाटप/एसआर/२४७/१९९३ मधील दिनांक २४.०८.१९९३ अन्वये आदेशानुसार गट क्र.१४५, ७५८, ७६४."

४. तसेच दावा कलम ६ मधील १४ ओळीमधील मजकुर म्हणजेच "१३८२" व १५ व्या ओळमधील मजकुर म्हणजेच "गट क्र.१४५, ७५८ आणि ७६४" हा

वगळण्यात यावे. तसेच मजकुर म्हणजेच "सदरील फेरफार क्र.१३८२ नुसार मे. तलाठी यांनी गट क्र.१४५, ७५८ आणि ७६४ या मिळकतीवर चुकीच्या नोंदी केलेल्या आहेत" हा वगळण्यात यावा.

५. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ३ नुसार स्थावर मिळकतीच्या संदर्भात मिळकतीच्या चतुःसिमा दाव्यात नमुद करणे आवश्यक असते. तसेच जर वादी यांचा अर्ज नामंजुर झाल्यास आणि भविष्यात यदाकदाचित वाटपाचा दावा मंजुर झाल्यास सदरील हुकूमनाम्याची अंमलबजावणी करतांना गुंतागूंत निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच वाटपाच्या दाव्यात सर्व वडीलोपार्जीत मिळकतीचे वाटप होणे आवश्यक आहे हे कायद्याचे तत्व आहे. त्यामुळे वादी यांचा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात यावा. सदरील दुरुस्तीअन्वये वादी कोणतीही नवीन केस मे. न्यायालयामध्ये घेऊन येत नाही. तसेच दावा दुरुस्ती मान्य झाल्यास मुळ दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सदरील दाव्याचे अद्याप चौकशी (Trial) सुरु झालेली नाही. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वास्तविक विवादीत मुद्दे/वादग्रस्त प्रश्न निश्चित करण्यासाठी वरील दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने कायदेशीर व योग्य आहे. जर सदरील दुरुस्तीचा अर्ज फेटाळल्यास वादी यांचे नुकसान होईन याउलट प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादी यांना त्यांची अतिरिक्त कैफियत व जबाब दाखल करता येईल. या सर्व कारणास्तव त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. सदर अर्जास जोरदार विरोध करुन प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांचा जबाब नि.५१ अन्वये दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादीस सदरचा दावा दुरुस्ती अर्ज या प्रतिवादींच्या विरुध्द दाखल करणेस कोणतेही कायदेशीर व संयुक्तीक कारण घडले नाही. वादीने दावा दुरुस्ती अर्ज हा या मे. कोर्टात दुस–यांदा दाखल केला आहे. सदरचा अर्ज दाखल करण्यास वादीस कोणतेही कायदेशीर व संयुक्तीक कारण घडलेले नाही. सदर दावा दुरुस्ती अर्जातील मजकुराबाबत या प्रतिवादींनी प्रथम कैफियत दाखल केली तेव्हाच वादीचे दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरीज प्रॉपर्टीजचे व चतुःसिमा बाबत हरकत नोंदविली होती. तथापि तरी देखील वादींनी प्रथम दावा दुरुस्ती अर्जात दखल घेतलेली नव्हती. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा. वादींनी या प्रतिवादीविरुध्द दावा दुरुस्ती अर्ज दाखल करुन जे आरोप केलेले आहेत ते सर्व आरोप खोटे व लबाडीचे व बिनबुडाचे असे असुन ते बेकायदेशीर असे आहेत ते प्रतिवादीस मुळीच मान्य व कबुल नाहीत. वादींनी ज्या स्वरुपात सदरचा दावा दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे. त्या स्वरुपात तो कायद्याने मुळीच चालणारा व टिकणारा नाही. वादीचे सदरचे दुरुस्ती अर्जातील परिच्छेद क्र.२ मधील नमुद मजकुर हा कायदेशीर नसुन तो पुर्णपणे खोटा व लबाडीचा आहे. तहसीलदार सा़ो दौंड यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसुलच्या अधिनियम कलम १५५ नुसार जो अर्ज दाखल केला होता तो मुलतःच बेकायदेशीर असा होता. त्यामुळे तो तहसीलदार सा़ो दौंड यांनी फेटाळला आहे. गट क्र.७६४, ७५८ व १४५ या गटांचे पुर्वीच वाटप झालेले आहे. त्यामुळे सदर परिच्छेद मजकुरात कोणतेही

सत्य नसुन तथ्य नाही. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज नामंजुर करावा.

७. त्यांचे पुढे असे कथन आहे की, वादीचे दुरुस्ती अर्जातील परिच्छेद क्र.३ व ४ मधील मजकुर हा धादांत खोटा व लबाडीचा असुन दावा दाखल केल्यानंतर वादीने स्वतःचा नि.५ चा अर्ज मे. कोर्ट सा‍ो यांचेकडुन मंजुर करुन घेतला आहे. त्यामुळे वादीस सदर दुरुस्ती अनुषंगाने पुन्हा चतुःसिमाबाबत दुरुस्ती करणे, तसेच मजकुर वगळणे बाबतची दुरुस्ती केल्यास दाव्यात अमुलाग्र असा बदल होणार आहे. दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. तसेच या प्रतिवादींवर नाहक अन्याय होणार आहे. त्यामुळे वादीचा सदरचा दावा दुरुस्ती अर्ज खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे. वादीच्या सदरच्या दुरुस्ती अर्जात परिच्छेद क्र.५ व ६ मध्ये नमुद मजकुर कायदेशीर नसुन वादीस सदर मजकुर अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्याचा हक्क अधिकार नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे कामकाज लांबविण्याचा वादी जाणिवपुर्वक प्रयत्न करीत असुन या प्रतिवादींवर अन्याय होणार आहे. तसेच सदरचा दावा दुरुस्ती अर्ज या मे. कोर्टात दाव्याचे कामकाज लांबणीवर पडण्यासाठी व या प्रतिवादींना नाहक मानसिक त्रास देऊन त्यांना खर्च करण्यास भाग पाडणेकरीता सदरचा दावा दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे तो बेकायदेशीर असा असुन तो त्वरीत रद्द होण्यास पात्र आहे. वादीच्या सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्यात निश्चितपणे अमुलाग्र असा बदल होणार असल्याने व दाव्याचे मुळ स्वरुपच बदलणार असल्याने वादीचा दुरुस्ती अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

८. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. डी. अंबोधरे व प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बी. व्ही. देशमुख यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

९. अर्ज व जबाब वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि.१५.०९.२०१८ रोजी वादींनी प्रतिवादींविरुध्द वाटप, जाहीर ठराव, निरंतर मनाई व स्वतंत्र ताब्याकरीता दावा दाखल केलेला आहे. दि.१७.०९.२०१८ रोजी दाव्यास क्रमांक पडला. त्याच दिवशी माझे पुर्वाधिकारी यांनी प्रतिवादींना समन्स काढण्याचे आदेश केले. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दाव्यात हजर झाले. त्यांनी त्यांची कैफियत व जबाब नि.२३ अन्वये दाखल केलेले आहे. माझे पुर्वाधिकारी यांनी नि.५ चा अर्ज गुणदोषावर दि.१२.१२.२०१८ रोजी मंजुर केलेला आहे. त्यानंतर वादींनी नि.३० अन्वये दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला. तो अर्ज माझे पुर्वाधिकारी यांनी गुणदोषावर दि.२८.०८.२०१९ रोजी मंजुर केला. त्यानुसार दाव्यात वादींनी दुरुस्ती केली. नि.१अ दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दुरुस्त दाव्यास जादा कैफियत व म्हणणे नि.४४ अन्वये दाखल केले आहे. मी नि.४६ नुसार दि.१२.०७.२०२२ रोजी दाव्यात मुद्दे निश्चित केलेले आहेत. तदनंतर दावा हा वादींच्या पुराव्याकरीता नेमलेला असतांना प्रस्तुत अर्ज दि.२३.०१.२०२३ रोजी दाखल केलेला आहे.

१०. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी दावा कलम १अ ते १इ यांच्या चतुःसिमा समाविष्ट

कराव्यात, तसेच दावा कलम १इ नंतर इतर दावा मिळतींचे सविस्तर वर्णन इ(१) ते इ(३) समाविष्ट करावे, दावा कलम ६ मधील अर्जात नमुद मजकुर वगळण्यात यावा अशी विनंती करीत आहे. अर्जात नमुद दुरुस्ती म्हणजे दावा मिळकत १अ ते १इ च्या चतुःसिमा तसेच इतर मिळकतींचे वर्णन या दाव्यातील मिळकती ओळखीसंदर्भात व दाव्यातील वादाचे निराकरण करण्याकामी नियोजित दुरुस्ती ही आवश्यक असल्याचे दिसुन येते. वाटप, जाहीर ठराव, निरंतर मनाई व स्वतंत्र ताबा हे स्थावर मिळकती संदर्भात वादींनी मागितले आहे. त्यामुळे स्थावर मिळकतीचे संपुर्ण वर्णन/चतुःसिमा दाव्यात समाविष्ट केल्याशिवाय दाव्यात परिणामकारक अनुतोष दिला जाऊ शकत नाही. तसेच प्रतिवादींना त्यांची कैफियत दुरुस्ती करण्याची अगर दुरुस्त दाव्यासंबंधी उलटतपासात प्रश्न विचारण्याची संधी आहे. प्रस्तुत अर्ज दाव्यात मिळकतीच्या चतुःसिमा व वर्णन व त्यासंबंधी विनंती कलमात मजकुर समाविष्ट करण्याबाबत आहे. त्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणतेही बदल होणार नाही असे माझे मत आहे. तसेच दावा अगर खटल्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता व वरील सर्व बाबींचा सर्वकष विचार करता वादीचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहेः–

## आदेश

१. वादींचा नि.क्र.४७ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी सदर आदेशापासुन १४ दिवसांच्या आत अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते. तसेच अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करावी व त्या अनुषंगाने वादींनी दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी व दावा दुरुस्तीच्या प्रती सर्व प्रतिवादींना पुरवाव्यात. त्यानंतर पुढील योग्य ते आदेश करण्यात येतील.

३. खर्चाबाबतचे आदेश निकालाधीन.

JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL

Digitally signed by JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Date: 2024.03.22 17:43:37 +0530

दौंड
दि.२२.०३.२०२४

[ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>Jt. C.J.J.D., Daund, Dist. Pune. |
| Order date | :- | 22.03.2024. |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 22.03.2024. |
| Order uploaded on | :- | 22.03.2024. |